दिनांक : ०१.०४.२०२५

प्रिझम फौंडेशन

वार्षिक अहवाल २०२४ - २०२५

दि. १०.०६.२०२४ पासून तिन्ही शाळा नियमित सुरू झाल्या.

वार्षिक कार्यक्रम

| क्र. | दिनांक व वार | सांस्कृतिक कार्यक्रम | प्रमुख पाहुणे | विषय / कार्यक्रम | जबाबदारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१.०६.२०२४ | संस्थापन दिन | प्रिझम फौंडेशन ट्रस्टी | ललित लेखाचे अभिवाचन - विद्या भागवत | प्रिझम फौंडेशन |
| २ | २९.०६.२०२४ | पालखी | - | विद्यार्थ्यांनी भक्ती गीते, अभंग, नृत्य सादर केली. | फिनिक्स स्कूल |
| ३ | १५.०८.२०२४ | १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन | प्रिझम फौंडेशन ट्रस्टी | ध्वजारोहण, झेंडावंदन | प्रिझम फौंडेशन |
| ४ | २६.०९.२०२९ | कै. पद्मजा गोडबोले आंतरशालेय कविता पाठांतर स्पर्धा | श्री. धीरज मडके | कविता पाठांतर स्पर्धा<br>बाहेरील ७ शाळेतील ४८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. | फिनिक्स स्कूल |
| ५ | २६.०१.२०२५ | २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन | रिअर ॲडमिरल (रिटायर्ड) आशिष कुलकर्णी | विद्यार्थ्यांचे डंबेल्स्, घुंगरू काठी, काठी कवायत, मानवी मनोरे व पिरॅमिड याचे सादरीकरण केले. | प्रिझम फौंडेशन |
| ६ | ०१.०२.२०२५ व ०२.०२.२०२५ | प्रदर्शन | आंतरराष्ट्रीय बुध्दिबळपटू श्री. जयंत गोखले | विषय - खेळ<br>तिन्ही शाळेतील विद्यार्थ्यांनी विषयानुरूप तयार केलेले चार्ट, मॉडेल मांडले होते. फन-गेम्स्, बाहेरील विविध विक्री स्टॉल होते.<br>कार्यशाळेत विविध खाद्यपदार्थ होते. | प्रिझम फौंडेशन |

- पर्यावरण दिना निमित्त तिन्ही शाळेत विद्यार्थ्यांकडून झाडांची रोपे लावणे व त्यांना नियमित पाणी घालणे, झाडे व फुल झाडांची नावे व माहिती, परिसर व वर्ग स्वच्छता इ. उपक्रम

- योगा दिना निमित्त तिन्ही शाळेत विद्यार्थ्यांकडून कवायत प्रकार , क्षमतेप्रमाणे योगासने करून घेण्यात आली .
- संस्थेत १५ ऑगस्ट २०२४ स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला . ध्वजवंदनास विश्वस्त मा . प्रकाश डिंगणकर सर व सर्व स्टाफ उपस्थित होता . मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले .
- दरवर्षी प्रमाणे तिन्ही शाळेत शिक्षक दिन साजरा करण्यात आला . शिक्षक दिना निमित्त प्रिझम कडून सर्वांना भेटवस्तू देण्यात आली .
- प्रिझम फौंडेशन मध्ये गणेश स्थापना करण्यात आली . गणपती स्थापनेचे सर्व आयोजन फिनिक्स शाळेने केले होते . यावर्षी 'खेळ' या विषयावर गणपती सभोवती व हॉल सजावट करण्यात आली होती . विद्यार्थ्यांनी विषयानुरूप चार्ट, मॉडेल बनवून आणले होते . गणेशोत्सवा निमित्त लार्क व एम . ओ . व्ही . एस शाळेत विविध स्पर्धाचे आयोजन केले होते . गणेश विसर्ज नाची तयारी लार्क व एम . ओ . व्ही . एस शाळेतील विद्यार्थ्यांनी करून ढोल ताशांच्या तालावर लेझीम खेळून गणपती विसर्जन केले .
- तिन्ही शाळेत दिवाळी पार्टी साजरी करण्यात आली . विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सर्व दिवसाचे महत्त्व सांगितले . विद्यार्थ्यांनी किल्ला बनविला, आकाश कंदील लावला, रांगोळी काढली, वर्ग सजावट केली, पणत्या लावून व नाच गाणी करून दिवाळी साजरी करण्यात आली . प्रिझम कडून सर्व विद्यार्थ्यांना व स्टाफला कुर्मा भाजी पुरी व शिरा ही पार्टी देण्यात आली .

अभ्यास विषयक

- अभ्यासक्रमाच्या दृष्टीने प्रत्येक शाळेला उद्दिष्टे आणि अभ्यासक्रमाचा नमुना देण्यात आला . शैक्षणिक साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा असे सांगण्यात आले . प्रत्येक विद्यार्थ्याच्या गरजेनुसार त्यांच्या पाठयक्रमात बदल करावा व सुधारणा करावी असे सांगण्यात आले . ठराविक विषयांच्या व्यतिरिक्त कार्यविषय शिक्षण अभ्यासक्रमात समावेश करावा .

मिटिंग / सभा

**विश्वस्त**

- मे महिन्यात ट्रस्ट मिटिंग झाली . यात तीन ट्रस्टी ऑनलाइन व तीन ट्रस्टी संस्थेत उपस्थित होते .
- जानेवारी महिन्यात संस्थेत ट्रस्ट मिटिंग झाली . संचालिका व चार ट्रस्टी मिटिंगला उपस्थित होते .
- ट्रस्टी बरोबर वेळोवेळी WhatsApp call, message, meeting व्दारे कामकाजा संदर्भात
- विश्वस्तांबरोबर ILS case व संस्थेच्या कामकाजा संदर्भात

**ॲडमिन व अकांउट स्टाफ :** कामकाजाचे नियोजन, व्यवस्थापनामधील मुद्दे, ISO Audit, Website, Facebook, YouTube, बॅकेच्या कामकाज, Financial Audit व इतर संबंधित कामकाजा संदर्भात
WhatsApp call व्दारे कार्यालयीन कामकाजाबाबत

**कार्यक्रम :** पालखी, कै . पद्मजा गोडबोले आंतरशालेय कविता पाठांतर समिती, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी या कार्यक्रमा संबंधित शिक्षकांबरोबर नियोजन संदर्भात

**तिन्ही शाळांच्या मुख्याध्यापिका :** वर्षभरातील सांस्कृतिक कार्यक्रम, अभ्यासक्रम, नविन विद्यार्थी - एज्यकेअर रिपोर्ट, अगोदरच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्मदाखला घेणे, बाहेरील स्पर्धा, ISO Audit, विद्यार्थ्यांचे मेडिकल चेकअप, गणेशोत्सव, बाहेरील प्रदर्शन व स्टॉल, दिवाळी पार्टी, सुट्टी, पालक फिडबॅक, स्नेहसंमेलन, क्रीडा दिन, २६ जानेवारी, ई-लर्निंगचा वापर, शैक्षणिक सहल, सहल, पालक सभा, विद्यार्थ्यांनी उर्वरित फी, फी sponsorship, गॅदरिंग, तिन्ही शाळांचे एकत्रित प्रदर्शन नियोजन व आयोजन, ज्ञानप्रबोधिनी GTBT प्रोजेक्ट, इन-हाउस ट्रेनिंग शिक्षक अभ्यासक्रम, बेन्यू कोर्स, बाहेरील कार्यशाळा, बाहेरील शाळा व कॉलेजला भेट देणे, इंटर्नशिपला आलेले विद्यार्थी, बाहेरील प्रदर्शन, विद्यार्थी परिपत्रक, १८ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांबरोबर बोलणे
पुढील वर्षी संदर्भात - वार्षिक फी, नविन ॲडमिशन, फी, एज्युकेअर रिपोर्ट व कागदपत्रे, कॅलेंडर व नियोजन, अभ्यासक्रम, कामाची विभागणी, शिक्षक संख्या, युनिफॉर्म व शूज, बेन्यू अभ्यासक्रम, कोर्स, इन-हाउस ट्रेनिंग, कोर्स, बाहेरील कार्यशाळा व नियोजन
सर्व मुख्याध्यापिकांबरोबर WhatsApp call व्दारे - नविन ॲडमिशन, युनिफॉर्म, फी, कॅन्टिन, आनंदमेळा संदर्भात
बेन्यू मुख्याध्यापिकेबरोबर संस्थेच्या कामकाजाबाबत

**प्रिझम शिक्षक स्टाफ :** ई लर्निंगचा वापर करावा, अभ्यासाचे नियोजन, शैक्षणिक सहली, IEP बाबत बारकाईने काम करावे, स्नेहसंमेलनाबाबत सूचना, अॅक्टिव्हिटी, कामाचे नियोजन तसेच आवश्यकतेनुसार वेळोवेळी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले .
**एम . ओ . व्ही . एस :** मुख्याध्यापिका, प्रभारी मुख्याध्यापिका व शिक्षक - कामाचे विभाजन व नियोजन संदर्भात, Craftizen Capacity Building Program अंतर्गत झालेल्या कार्यशाळेतील ट्रेनिंग संदर्भात, उत्पादन, बाहेरील स्टॉल, वस्तू विक्री, प्रदर्शन सहभागात संस्थेची माहिती इ .

**रिक्षा व व्हॅन :** दरवाढी संदर्भात, रिक्षा व व्हॅन काकांची माहिती, विद्यार्थ्यांची यादी इ .
रिक्षा व व्हॅन काकांबरोबर विद्यार्थ्यांची सुरक्षितता व विद्यार्थ्यांबरोबरची वागणुक संदर्भात

**पालक सभा :** तिन्ही शाळांच्या पालक सभेत नवीन पालकांना प्रिझम फौंडेशनची माहिती देण्यात आली . फी संदर्भात, देणगीबाबत आवाहन करण्यात आले आहे . वेळोवेळी घेतल्या गेलेल्या पालकसभेतही पालकांशी संवाद साधण्यात आला .

**देणगी संदर्भात :** डॉ . लैला गारडा, CKP Foundation - श्री निलेश गुप्ते व शिल्पा इनामदार, सोलर पॅनेल - श्री . सुळे, टोयोटा कंपनी - अभिषेक शेलार, PLUG POWER – Mr. Heet Visawadia, Brain Burg Foundation - किरण दरोडे व अक्षय देसाई, चिदानंद फौंडेशन - श्री व सौ . वैजापूरकर, Cybage Software Pvt. Ltd. - श्री . प्रशांत महामुनी व श्री . अमोल टकले व श्री . अमोल जेऊरकर, औंध बाणेर ज्येष्ठ नागरिक संघ - सुरेखा कुलकर्णी, श्रीमती सनेर व सखी ग्रुप, Durva Solution Ltd, Bank Of Maharashtra Retired Employees Welfare Organisation - श्री . बन्सल व श्री अंभ्यकर, मीनल पाध्ये व विनय राहतेकर, सुधीर परांजपे व स्वाती पाध्ये यांच्याबरोबर डोनेशन व CSR प्रोजेक्ट संदर्भात उषा मोडक, श्री . भाऊसाहेब जाधव, श्री व सौ घारे व प्रा . पंडीत, श्री . अरूणकुमार, अश्विनी परांजपे, SAKA Engineering System Pvt. Ltd. , Munitions India Limited

**संस्थेची माहिती / जागरूकता :** प्रा . अनिल दांडेकर, श्री . उदय गाडगीळ, श्री . बागडा, सीमा मराठे, श्री व सौ . पुंडले, श्री . शेलार, श्री . देशपांडे, मेधा साठे, आर्या खैरनार यांच्याबरोबर फिजिओथेरपी आणि सेन्सरी गार्डन व्हिझीट, डेक्कन पोलिस चौकी - श्री . शुभम पाटील, दिलीप फळटणकर, श्री . रावजी, क्षितीज साठे, मेधा साठे व शुभदा गोडबोले- जागरूकता फिल्म बनविण्याबाबत, औंध बाणेर ज्येष्ठ नागरिक संघ - श्री . सुधीर परांजपे, सुरेखा कुलकर्णी श्री . गुर्जर, स्वाती शिंदे, आरती शिंदे, IMCTF आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग- श्री . सारडा, डॉ . रेड्डी फौंडेशनच्या डॉ . मनिषा मख्वानी व महेश भवले, अॅड . लिमये - ILS case

**शैक्षणिक / कार्यशाळा :** गरवारे बालभवन - राज पाठक ऑटिझम विषयक मार्गदर्शन, भरत राऊत, विवेक शील व प्राची शर्मा -Capacity Building Program – training - ३ मिटिंग झाल्या, इशिता कुलकर्णी - डाउम्स सिंड्रोम रिसर्च संदर्भात, ज्ञान प्रबोधिनी च्या केतकी कुलकर्णी यांच्याबरोबर GTBT प्रोजेक्ट, स्नेहा जोशी MSW , SNDT अभ्यासासंदर्भात, मृणाल राजहंस special needs च्या प्रोजेक्ट, गोखले इन्स्टिटयूट प्रोजेक्ट, ज्ञानप्रबोधिनी - अनघा लवलेकर, केतकी कुलकर्णी व शामांगी यांच्या बरोबर GTBT प्रोजेक्ट, अश्विनी नवाथे व डॉ . श्रुती गोडबोले - म्युझिक थेरपी,
प्राची तांबे या अध्ययन अक्षमता - Ph.D करत आहेत, मार्गदर्शन, नोटस् व ऑडिओ बाबत
गरवारे कॉलेज सायकॉलॉजी डिपार्टमेंट SY BA - धनश्री सूर्यवंशी व कौशल्या राजेंदरन् या दोन विद्यार्थ्यांनीना लेखन अहवाल या प्रोजेक्टसाठी संस्थेची माहिती देण्यात आली . विप्रदा गद्रे -रिसर्च साठी संस्थेची माहिती देण्यात आली .

**कार्यशाळा :** सोफोश तारा केंद्र - पिंपरी - वैदही कुलकर्णी यांच्याबरोबर वर्षभर शिक्षक कार्यशाळा घेण्यासंदर्भात
पुढील वर्षी ही सेशन घेण्याबाबत बोलणे झाले आहे .

**प्रदर्शन :** आकाश सावले, योगेश, वाळूंज, सूरज मंडपवाले, उमेश कांबळे इ . बरोबर कामासंदर्भात
डॉ . मनिषा खरे यांच्याबरोबर संस्थेत घेण्यात येणा-या पाक-कला स्पर्धा व परिक्षक म्हणून येण्या संदर्भात
प्रदर्शनाचे प्रमुख पाहुणे आंतरराष्ट्रीय बुध्दिबळ पटू श्री .जयंत गोखले यांनी संस्थेला भेट देवून माहिती घेतली .

**हॉल भाडेतत्व :** वैजयंती वावळ, बळीराम पवार, मनिषा साठे, सोनल नवरे व सुप्रिया महाजन, नवरे, श्री. देवरूखकर

**मेटेन्स :** Samsung कंपनीतून महेश यांच्याबरोबर प्रिन्टर व झेरॉक्स मशिन इ.

**इतर :** सावी मॅन्युफॅक्चरिंग - चेतन शिंगवी- तिन्ही शाळेच्या युनिफॉर्म संदर्भात, श्री. काळे, दिलीप पटवर्धन, कौस्तुभ चिनके - सिक्युरिटी सर्व्हिस, राधेश्याम - सिक्युरिटी गार्ड बाबत, ॲडमिशन - श्री व सौ जेसवानी, श्री. वर्तक - मुंबई

वेन्यू ट्रेनिंग इन्स्टिटयूटच्या मुख्याध्यापिकेने सर्व मुख्याध्यापिका, ॲडमिन व अकांउट स्टाफ बरोबर कार्यालयीन कामकाजाबाबत

**कायदेविषयक**

- ॲड.धामणकर व ॲड. निंबकर व ॲड. अंतुरकर यांच्याबरोबर ILS केस संदर्भात शशिकांत पटवर्धन, किशोर सरपोतदार, हर्षा मुळे, यांनी मिटिंग घेतली. याबाबत सातत्याने संपर्कात आहेत.
- ILS Case - हायकोर्टात केस सुरू आहे.
- श्री. शशिकांत पटवर्धन यांची संस्थेचे सातवे ट्रस्टी म्हणून नेमणूक झाली.

वैद्यकीय तपासणी

- डॉ. मोघे व डॉ. प्रभुणे यांनी सप्टेंबर मध्ये तिन्ही शाळेतील विद्यार्थ्यांचे मेडिकल चेकअप केले.

ISO 9001 : 2015

- हर्षा मुळे यांनी ऑगस्ट २०२४ व फेब्रुवारी २०२५ मध्ये ISO चे Internal Audit घेतले.
- नोव्हेंबर २०२४ मध्ये Surveillance Audit - Lead Auditor श्री. प्रविण चौधरी यांनी घेतले.

वेबसाईट / YouTube / Facebook

- वर्षभरात Web-site व Facebook वर संस्थेतील कार्यक्रमाचे फोटो, बातमी पाठविण्यात आली. तसेच काही कार्यक्रमाची YouTube link तयार करून पाठविण्यात आल्या.
- शुभदा गोडबोले व मेधा साठे यांच्या सहकार्याने प्रिझम फौंडेशनची जागरूकता फिल्म तयार करण्यात आली. ही फिल्म त्यांच्या ऐच्छिक सहकार्याने तयार झाली.

जागरूकता

- Podcast - प्रिझम फौंडेशनची माहिती पोहचविण्याच्या उद्देशाने विरेंद्र देवस्थळी यांची मदत घेण्यात आली. हर्षा मुळे यांनी प्रिझम फौंडेशनची माहिती व सुचेता पावगी यांनी फिनिक्स शाळेची माहिती दिली.
- NCCS Pune University येथे संस्थेची माहिती देण्यात आली.
- पूना क्लब, प्रोत्साहन (२ प्रदर्शन), उमंग सिल्करूट (२ प्रदर्शन), SNDT B.Ed College, रोटरी क्लब पूना वेस्ट, मेधा साठे - औंध वाङमय मंडळ या सर्वांनी आयोजित प्रदर्शनात संस्थेने सहभाग घेतला होता. प्रदर्शनाला भेट देणा-या व्यक्तींना संस्थेचे माहितीपत्रक देवून संस्थेच्या कामकाजाबाबत सांगण्यात आले. प्रदर्शनात एम.ओ.व्ही.एस विद्यार्थ्यांनी बनविलेल्या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. प्रतिसाद चांगला होता.
- चिदानंद फौंडेशन - देणगी समारंभात हर्षा मुळे यांनी संस्थेची माहिती दिली.
- औंध बाणेर ज्येष्ठ नागरिक संघ येथे हर्षा मुळे यांनी संस्थेची माहिती दिली.
- बॅंक ऑफ महाराष्ट्र रिटायर्डच्या देणगी वितरण समारंभास वेन्यू ट्रेनिंग इन्स्टिटयूटच्या मुख्याध्यापिका विद्या भागवत उपस्थित होत्या.
- मुकेश प्रतिष्ठान आयोजित उपक्रमात छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी निमित्त 'छावा' चित्रपट विशेष विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. या उपक्रमात लार्क व एम.ओ.व्ही.एस शाळेतील ३० विद्यार्थी सहभागी झाले होते.

बाहेरील भेट

- Symbiosis College – Psychology Department मधील ८0 विद्यार्थ्यांनी भेट देवून माहिती घेतली .
- मॉडर्न कॉलेज सायकॉलॉजी डिपार्टमेंट मधील २ शिक्षक व ३५ विद्यार्थ्यांनी भेट देवून माहिती घेतली .
- जागतिक डाउन्स सिंड्रोम दिना निमित्त IHCL's CSR अंतर्गत ब्लू डायमंड मधील HR डिपार्टमेंटच्या सीमा लेले व त्याचे १४ सहका-यांनी संस्थेला भेट देवून माहिती घेवून विद्यार्थ्यांशी संवाद साधला .
- MIT Psychology Department च्या २४ विद्यार्थ्यांनी संस्थेला भेट देवून माहिती घेतली .

भेट

- हर्षा मुळे व विद्या भागवत यांनी सोफोश तारा केंद्र – पिंपरी येथे भेट देवून माहिती घेतली .
- सृजन प्रतिष्ठान – क्षमता विकसन केंद्र यांनी श्री . सिनारे यांच्याबरोबर 'विशेष विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी' या विषयावर मिटिंग घेतली होती . या मिटिंग मध्ये हर्षा मुळे व स्वाती सगम यांनी सहभाग घेतला .
- गोखले इन्स्टिटयूट आयोजित दिव्यांग व्यक्तीसाठी सरकारी योजनांची जागरूकता या परिसंवादामध्ये लार्क शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती सगम सहभागी झाल्या होत्या .

प्रोजेक्ट

- ऑगस्ट महिन्यात ज्ञानप्रबोधिनी बरोबर करत असलेले GTBT प्रोजेक्ट पूर्ण झाले .
- सप्टेंबर पासून सोफोश – तारा केंद्र पिंपरी येथील शिक्षक, मावशी व नर्स यांना मार्गदर्शन सेशन्स घेणे सुरू झाले आहे . यासाठी महिन्यातून एकदा विद्या भागवत सेशन्स घेतले .

बाहेरील कार्यशाळा

- बालकल्याण संस्था आयोजित 'नॅचरोपॅथी, योगासने व प्रथमोपचार' कार्यशाळेत संस्थेतील तीन शिक्षकांनी सहभाग घेतला .
- Craftizen Capacity Building Program अंतर्गत – कार्यशाळा आयोजित केली होती . या कार्यशाळेस दोन शिक्षकांनी सहभाग घेतला होता .
- स्पार्क फौंडेशन आयोजित 'संस्था सक्षमीकरण' या विषयावरील ऑनलाईन कार्यशाळेस हर्षा मुळे यांनी सहभाग घेतला .

इंटर्नशिप

- कर्वे इन्स्टिटयूट मधून MSW करणारे दोन विद्यार्थीनी तिन्ही शाळेत इंटर्नशिप साठी सोमवार, मंगळवार व बुधवार येत होत्या .
- फिनिक्स, लार्क व एम . ओ . व्ही . एस शाळेत मॉडर्न, फर्ग्युसन, गरवारे, एस . एन . डी . टी कॉलेज, डी . इ . एस सोसायटी बिजलाल जिंदाल कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, SEED - Art Based Therapy course अंतर्गत ABT सेशन्स घेण्यासाठी, सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हसिटी इ . मधून विद्यार्थी / विद्यार्थीनी येत होत्या .

सत्कार

- सिल्करूट आयोजित प्रदर्शनात महिला दिनानिमित्त '२५ कर्तृवान स्त्रियांचा गौरव' हा सोहळा साजरा करण्यात आला . यामध्ये प्रिझम फौंडेशच्या संचालिका हर्षा मुळे यांचा गौरव करण्यात आला .

शिक्षक

- नविन आलेल्या शिक्षकांना नियुक्ती पत्र देण्यात आले .
- नवक्षितिज तर्फे विशेष शिक्षक सन्मान सोहळा आयोजित केला होता . या सोहळयात संस्थेतील सहा शिक्षकांचा आदर्श शिक्षक म्हणून सन्मान करण्यात आला . कार्यक्रमामध्ये उपस्थित व्यक्तींना शिक्षकांनी संस्थेचे माहितीपत्रक दिले .
- वाकड येथील अदिराज फौंडेशन शाळेत कवायत स्पर्धा आयोजित केल्या होत्या . या स्पर्धेच्या परिक्षक म्हणून लार्क व एम . ओ . व्ही . एस शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती सगम या उपस्थित होत्या .

शिक्षक राजीनामा

- फिनिक्स शाळेच्या मुख्याध्यापिका सुचेता पावगी यांनी त्यांच्या वैयक्तिक कारणामुळे राजीनामा दिला आहे .

रिक्षा

- HSRP Number plat साठी रजिस्टेशन करून फी भरण्यात आली आहे.

अकांउट

- Financial Audit साठी नविन CA सार्थक कोठावळे यांची नेमणूक करण्यात आली.
- Professional Tax व Property Tax भरण्यात आला.
- सर्व प्रिझम स्टाफला दिवाळी बोनस देण्यात आला.
- सर्व प्रिझम स्टाफला सॅलरी सपोर्ट फंड (एक महिनाचा पगार ) देण्यात आला.
- वेगवेगळया व्यक्तींना व संस्थांना डोनेशन अपील पाठविणे चालू आहे.

दुरूस्ती

- हॉल नं. १ व २, वर्ग क्र. १५, १६ व सर्व टॉयलेटचे रंगकाम करून घेण्यात आले.
  इलेक्ट्रिसिटी - वर्ग व कॅम्प्यूटर रूम मध्ये फॅन, टयूब लाईट, नविन बोर्ड बसविण्यात आले.
  शिक्षक टॉयलेट व इतर सर्व टॉयलेट मध्ये टाइल व प्लंबिंगचे काम करून घेण्यात आले.
- हॉल नं़ २ मधील पोटमाळयाला लोखंडी दार करून घेण्यात आले. टेबल, खुर्च्यांची दुरूस्ती व खिडक्यांना फायबर शीटस् लावण्यात आले. कॅम्प्यूटर रूम मधील लाकडी सिलिंग खराब झाल्यामुळे काढण्यात आले.
- वॉटर प्युरिफायर-नविन कॅन्डल बसविण्यात आले, बोअरवेल पाईप नविन बसविण्यात आला, पिण्याच्या पाण्याचे कुलर
- गॅस - रेग्युलेटर व पाईप बदलण्यात आला.
- रिक्षेची किरकोळ दुरूस्ती करून घेण्यात आली आहे.
- वर्षभरात इलेक्ट्रिकसिटी, कॉम्प्युटर व प्रिन्टर, सुतार काम, प्लंबिंग, EPBX, CCTV मशिन यावर आवश्यकतेनुसार कामे करून घेण्यात आली.

आनंद विद्यालय शिरवळ

- मानातज्ज्ञ क्षमा उपासनी यांनी १४ नविन विद्यार्थ्यांचे टेस्टिंग केले.
- वर्षभरात सर्व सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करून स्पर्धा घेण्यात आल्या.
- इ. १० वी ची परिक्षा दिलेले सहा विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले आहेत.
- वर्षभरात गृहआरोग्य ॲक्टिव्हिटी अंतर्गत उपक्रम करण्यात आले.
- विद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त असलेल्या कार्यक्रमास संचालिका हर्षा मुळे या उपस्थित होत्या.
- आनंद विद्यालयाच्या वार्षिक बक्षिस वितरण समारंभास शुभेच्छा देण्यात आल्या.
- वर्षभर हर्षा मुळे व नेहा परांजपे यांनी आनंद विद्यालयाला भेटून देवून कामकाजाचा आढावा घेवून मार्गदर्शन केले.

इतर

- तिन्ही शाळेतील विद्यार्थी बालकल्याण संस्थेत महिन्याच्या पहिल्या, तिस-या व पाचव्या मंगळवारी ॲक्टिव्हिटी साठी जात होते.
- जुलै व सप्टेंबर मध्ये अतिवृष्टीच्या सूचने मुळे प्रिझम कडून सर्व विद्यार्थी व स्टाफला एकूण दोन दिवस सुट्टया देण्यात आल्या.
- दिवाळी सुट्टीत प्रिझमचा संपूर्ण परिसर, सर्व ऑफिस व वर्ग खोल्या मधे पेस्ट कंट्रोल करण्यात आले.

हर्षा मुळे
संचालिका
प्रिझम फौंडेशन